**<u>नियमित दिवाणी दावा क्रमांक १४/२००४ मधील</u>**

**<u>निशाण २३१ वरील आदेश</u>**

सदरचा अर्ज वादी यांनी प्रतिवादी क्र. ९ महादेव जयराम तेंडुलकर हे दि. ०१/१२/२०२५ रोजी मयत झालेने त्यांचे वारस अभिलेखावर घेणेसाठी दाखल केलेला आहे. सदर अर्जावर म्हणणे मागविणेत आले. सदर अर्जावर 'Necessary order may be passed' असे प्रतिवादी तर्फे वकील यांनी म्हणणे दिले.

**०२.** निशाण २३०/१ येथील मृत्यु अहवालाचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, महादेव जयराम तेंडुलकर हे दिनांक ०१/१२/२०२५ रोजी मयत झालेले आहेत. सदर अर्ज हा दिनांक ०६/०२/२०२६ रोजी दाखल केलेला आहे असे दिसून येते. मयत प्रतिवादी क्र. ९ याचे वारस दाव्याचे कामी अभिलेखावर घेणे न्यायपूर्ततेच्या दृष्टीने आवश्यक व गरजेचे आहे. वादीने अर्जात नमूद केलेले प्रतिवादी क्र. ९ चे वारस हे प्रतिवादी क्र. ९ चे वारस नसल्याचीबाब प्रतिवादींनी कोठेही नाकारलेली नाही. दाव्याचे अवलोकन केले असता वाटपासाठी सदरचा दावा दाखल केलेला आहे. म्हणून सदर दाव्याचे कामी प्रतिवादी क्र. ९ यांचे वारस अभिलेखावर घेणे गरजेचे ठरते. सदर अर्ज हा मुदतीत आहे. सबब मी खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे:–

**<u>आ दे श</u>**

१. अर्ज मंजूर करणेत येत आहे.

२. वादी यांना प्रतिवादी क्र. ९ यांचे सदर अर्जात नमूद केलेले वारस रेकॉर्डवर आणणेसाठी परवानगी देण्यात येत आहे.

३. वादी यांनी प्रतिवादी क्र. ९ यांचे कायदेशीर वारस अभिलेखावर घेण्यासाठी योग्य ती दुरुस्ती करावी व दुरुस्त वादपत्राची प्रत या कामी दाखल करावी.

JOSHI SNEHAL RAJAN

Digitally signed by JOSHI SNEHAL RAJAN
Date: 2026.04.24 14:26:58 +0530

**दिनांक २४/०४/२०२६** **(एस. आर. जोशी)**

**ठिकाण लांजा.** **दिवाणी न्यायाधीश क.स्तर.लांजा,**

**जि.रत्नागिरी.**

***Certificate***

*I affirm that the contents of this pdf file Order are same words as per original Order,*

*Name of the Stenographer: S. D. Chavan*

*Court Name: Civil & Criminal Court, Lanja, Dist.Ratnagiri,*

*Date of decision : 24/04/2026*

*Order/Judgment signed by P.O.on: 24/04/2026*

*Order/Judgment uploaded on : 24/04/2026*